शनिपेठ पोलीस स्टेशन

प्रेस नोट

दिनांक- 22/08/2026

प्रती,

सर्व संपादक
दैनिक,साप्ताहिक
मासिक वृत्तपत्र जळगांव

विषय- शनिपेठ पोलीसांची धडक कारवाई 03 मोटार सायकल जप्त करून आरोपीच्या आवळल्या मुसक्या.

दिनांक-13/08/2026 रोजी जळगांव शहरातील बालाजी पेठ येथुन बजाज पल्सर मोटार सायकल हि अज्ञात चोरट्यानी चोरून नेली होती.सदर फिर्यादी हे बाहेर गावी होते फिर्यादी हे दिनांक-18/8/2026 रोजी घरी आले तेव्हा त्यांची बजाज कंपनीची पल्सर मोटार सायकल हि दिसुन आली नाही म्हणुन फिर्यादी निलेश प्रकाश बोरसे वय-27 रा-बालाजी पेठ जळगांव यांनी शनिपेठ पोलीस स्टेशन येथे गुरन-179/2026 BNS-303(2) प्रमाणे गुन्हा दाखल केला.

दिनांक-18/08/2026 रोजी शनिपेठ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल होताच लागलीच मा पोनि विशाल जयस्वाल सो यांनी शनिपेठ पोलीस स्टेशनच्या DB पथकास मोटार सायकल व आरोपीस शोधुन आण्याचे आदेशीत केल्याने लागलीच DB पथक कामाला लागुन बालाजी पेठ येथिल व परिसरातील CCTV फुटेज करून व परिपोउनि/संतोष खेडकर यांनी तांत्रीक विश्लेशन करून आरोपी बाबत माहिती काढुन संशयीत आरोपी नामे शेख ईरफान शेख रईस रा – एरंडोल ता एरंडोल जि जळगांव यास एरंडोल बसस्थानका वरून सापळा रचुन ताब्यात घेतले व त्यास सदर गुन्ह्या बाबत विचारपुस केले असता त्याने सदरची मोटार सायकल हि चोरी केल्याची कबुली दिल्याने आरोपीच्या ताब्यातुन चोरीस गेलेल्या मोटार सायकल ताब्यात घेवुन पुढील चौकशी चालु असुन पुढील तपास पोहेकाँ/1356 विजय खैरे हे करित आहे.

सशयीत आरोपी शेख ईरफान शेख रईस याचे ताब्यातुन बजाज कंपनीच्या दोन पल्सर व होन्डा कंपनीची एक युनीकाँन मोटार सायकल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आल्या आहे.

सदरची कार्यवाही मा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे सो , मा अपरपोलीस अधिक्षक संदिप गावीत सो , उपविभागीय पोलीस अधिकारी नितिन गणापुर सो यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक विशाल जयस्वाल तसेच परिपोउनि/संतोष खेडकर ,परिपोउनि/अभिषेक कटारे ,पोहेकाँ/विजय खैरे,पोहेकाँ/योगेश जाधव ,पोकाँ/पराग दुसाने,पोकाँ/अमोल वंजारी,पोकाँ/निलेश घुगे,पोकाँ/गणेश ढाकणे,पोकाँ/योगेश साबळे व CCTV फुटेज विशलेश्क पोकाँ/मुबारक देशमुख अशांनी केले.

पोलीस निरीक्षक
शनीपेठ पो.स्टे.जळगांव


शनिपेठ